पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २३/०३/२०२१

# चार जहाल नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

- *शासनाने एकुण २२ लाख रुपयांचे बक्षीस केले होते जाहिर.*

शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत आत्मसमर्पण केलेले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण २२ लाख रुपये बक्षीस असलेल्या एकुण ०४ जहाल नक्षलवादयांनी मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री अंकित गोयल सा., यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ०३ पुरुष आणि ०१ महीला नक्षलवादयाचा समावेश आहे.

१) **दिनेश उर्फ दयाराम गंगरू नैताम** हा २८ वर्ष वयाचा जहाल माओवादी असुन माहे डिसेंबर २००६ मध्ये टिपागड दलमच्या सदस्य पदावर भरती होवुन माहे फेब्रुवारी २००७ पासून टिपागड तसेच चातगाव दलममध्ये कार्यरत होता. माहे मार्च २००७ च्या शेवटी प्लाटून क्रमांक ०३ मधुन बदली होवुन भामरागड दलममध्ये कार्यरत होता. सन २०१० ला एसीएम पदावर भामरागड दलममध्ये पदोन्नती झाली. माहे सप्टेंबर २०११ ला दलम कमांडर म्हणुन पदोन्नती दिली व माहे डिसेंबर २०१८ पर्यंत कमांडर पदावर कार्यरत होता. माहे फरवरी २०१९ ला प्लाटुन क्रमांक ०७ चे गठण करून प्लाटुन क्रमांक ०७ चे कमांडर बनला. माहे आक्टोबर २०२० पर्यंत भामरागड एरिया कमांडर पदावर कार्यरत होता. त्याचेवर चकमकीचे ११ गुन्हे , खुनाचे ०६ गुन्हे, जाळपोळीचे ०३ गुन्हे दाखल असुन शासनाने त्याचेवर **एकुण ०८ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

२) **नकुल उर्फ सुखालुराम डुमा मडावी** हा ३५ वर्ष वयाचा माओवादी असुन तो माहे सप्टेंबर २००२ मध्ये टिपागड दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन माहे नोव्हेंबर २००३ मध्ये टिपागड दलममधुन बदलून प्लाटुन क्र. ०३ मध्ये कार्यरत होता. सन २००६ मध्ये प्लाटुन क्र. ०३ चा सेक्शन क्र.०१ चा उपकमांडर तर सन २००८ मध्ये प्लाटुन क्र. ०३ चा सेक्शन क्र. चा कमांडर म्हणुन कार्यरत होता. माहे एप्रिल २००७ मध्ये नक्षल सदस्या निला कुमरे हिचेसोबत लग्न केले. त्याचे**वर चकमकीचे ०९ गुन्हे, ०४ खुनाचे, जाळपोळीचे ०५ गुन्हे, ०१ भूसुरुंग स्फोटाचे गुन्हे दाखल असुन, त्याचेवर शासनाने ०८ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

३) **निला रुषी कुमरे** ही ३४ वर्ष वयाचा माओवादी असुन ती माहे नोव्हेंबर २००५ ला कसनसूर दलम मध्ये सीएनएमएम टिममध्ये सदस्या पदावरन भरती होवुन सन २००७ मध्ये नकुल उर्फ सुखालुराम डुमा मडावी प्लाटुन

क्र.०३ सेक्शन क्र. ०१ चा कमांडर याचेसोबत लग्न करून ते दोघेही कसनसूर दलममध्ये कार्यरत होते. तिचेवर **चकमकीचे ०३ गुन्हे, ०३ खुनाचे, जाळपोळीचे ०४ गुन्हे दाखल असुन, त्याचेवर शासनाने ०२ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

४) **<u>शरद उर्फ रमेश उर्फ गोविंदा सामजी आतला</u>** हा २६ वर्ष वयाचा माओवादी असुन तो माहे जानेवारी २०११ ला चातगाव दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन माहे सप्टेंबर २०१९ ला पीपीसीएम पदावर पदोन्नती होवून माहे नोव्हेंबर २०२० पर्यंत झोन टिडीला पीपीसीएम पदावर आजपावेतो कार्यरत. त्याचेवर **चकमकीचे ०६ गुन्हे, ०२ खुनाचे गुन्हे दाखल असुन, त्याचेवर शासनाने ०४ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपुर्ण यशस्वी नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच गेल्या दोन वर्षापासुन नागरी कृती शाखेमार्फत गडचिरोली पोलीसांनी जिल्हाभरात आदिवासी बांधवांकरीता घेतलेले जनजागरण मेळावे, शांती मेळावे, रोजगार मेळावे, ग्रामभेटी तसेच जे तरुण तरुणी नक्षलमध्ये भरती झाले आहेत, त्यांच्या घरी पोलीसांनी जावुन त्यांना सुखी जीवनाचे महत्व पटवुन सांगितल्याने व नक्षल नातेवाईकांसाठी दिलेली मदत व आयोजित केलेल्या सहली यामुळे त्यांच्या मनात पोलीस दलावर निर्माण झालेला विश्वास याचा परीपाक म्हणुन आज या ०४ जहाल माओवाद्यांनी हे आत्मसमर्पण केले आहे.

आदिवासी भागातील जनतेकडून नक्षलवादयांना मिळणारा अल्प प्रतिसाद, नक्षलवादी आदिवासी लहान मुले- मुली यांचा छळ करत त्यांचा नक्षली कारवायांसाठी करुन घेत असलेला वापर, वरीष्ठ नक्षलवादी आपल्या कुटूंबासह राहत असतांना आम्ही मात्र वर्षानुवर्षे आपल्या आप्तस्वकीयांपासुन लांब राहत असल्याची खंत मनात नेहमी असते. आपल्या कुटूंबांसोबत राहण्यासाठी आपण या नरक जीवनाला कंटाळुन सुखी जीवनाची कास धरण्यासाठी आत्मसमर्पण करत असल्याचे आत्मसमर्पीत माओवादयांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी दलममधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडून आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वित अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत विकासाच्या मुळ प्रवाहात यावे याबद्दल आवाहन केले.

गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे सन २०१९-२१ सालामध्ये आजपर्यंत एकुण ३७ माओवादयांनी आत्मसमर्पण केले असुन, यात ०४ डिव्हीसी, ०२ दलम कमांडर, ०२ दलम उपकमांडर, २८ सदस्य, ०१ जनमिलीशिया यांचा समावेश आहे.

विकास कामांना आडकाठी निर्माण करणाऱ्या नक्षलवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल. असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री अंकित गोयल सो. यांनी केले आहे.


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा